# नागरिकांची सनद

संदर्भ :— सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र— अ.शा.पत्र क्र. संकीर्ण १५१८/प्र.क्र.६३/१८—अ, दि.१५.१२.२०२१

व्याख्या : महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण मे—२०१२, २००६ यातील प्रकरण क्र.१ प्रारंभिक यातील व्याख्या या शिर्षकानुसार परिच्छेद क्र. २ मध्ये नागरिकांची सनद याचा अर्थ कार्यालयाने किंवा विभागाने दिलेल्या सुविधा किंवा सेवा यांची सूची, तसेच अशा सुविधा किंवा सेवा सर्वसामान्य जनतेला पुरविण्यासाठी असलेली कार्यमर्यादा असा आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्र आणि नमूद व्याख्येच्या अनुषंगाने न्यायीक जिल्हा, सोलापूर अंतर्गत सोलापूर मुख्यालयी तसेच जिल्हयातील तालुका स्तरावर सध्या कार्यरत असणा—या सर्व न्यायालयीन आस्थापनांची माहिती जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर या आस्थापनेच्या संकेतस्थळावर 'नागरिकांची सनद' असा विषय नमूद करुन याद्वारे खालीलप्रमाणे जाहिर प्रसिध्द केली जात आहे.

(अ) सोलापूर न्यायीक जिल्हयाकरीता माहे एप्रिल १८८४ पासून स्वतंत्र जिल्हा न्यायालयाची आस्थापना स्थापन करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| कार्यालयाचा पत्ता | — | जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर<br>डॉ.वैशंपायन वैद्यकीय महाविद्यालयाच्या समोर,सिव्हील चौक, सोलापूर—४१३००३ |
| संपर्कासाठी कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक | — | ०२१७— २६२७०७७ |
| ई—मेल आय—डी | — | mahshodc@mhstate.nic.in |

(ब) न्यायीक जिल्हा सोलापूर या जिल्हांतर्गत सोलापूर मुख्यालयी खालील संवर्गनिहाय न्यायालयांचे कामकाज चालते.

## मुख्यालय – सोलापूर

| अ. क्र. | आस्थापनेचे नांव | संवर्गनिहाय कार्यरत न्यायालये |
|---|---|---|
| १ | जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर | १. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश<br>२. जिल्हा न्यायाधीश<br>३. तदर्थ जिल्हा न्यायाधीश |
| २ | दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, सोलापूर | १. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर<br>२. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| ३ | मुख्य न्यायदंडाधिकारी, सोलापूर | मुख्य न्यायदंडाधिकारी, सोलापूर |
| ४ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर (संवर्ग– दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ) |
| ५ | दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर (महानगरपालिका न्यायालय), सोलापूर | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| ६ | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.२, सोलापूर | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| ७ | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.३, सोलापूर | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| ८ | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दारुबंदी न्यायालय, सोलापूर | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |

(क) न्यायीक जिल्हा सोलापूर या जिल्हांतर्गत तालुका स्तरावर खालील संवर्गनिहाय न्यायालयांचे कामकाज चालते.

## सोलापूर जिल्हांतर्गत तालुका स्तरांवरील न्यायालयीन आस्थापना

| अ. क्र. | ठिकाण | आस्थापनेचे नांव | संवर्गनिहाय कार्यरत न्यायालये |
|---|---|---|---|
| १ | तालुका पंढरपूर | जिल्हा न्यायाधीश–१ यांचे न्यायालय, पंढरपूर | १. जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश<br>२. तदर्थ जिल्हा न्यायाधीश |
| | | दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, पंढरपूर | १. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर<br>२. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर व अतिरिक्त मुख्य न्यायादंडाधिकारी |
| | | सह दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, पंढरपूर | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| | | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय, पंढरपूर | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| २. | तालुका बार्शी | जिल्हा न्यायाधीश–१ यांचे न्यायालय, बार्शी | १. जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश<br>२. तदर्थ जिल्हा न्यायाधीश |
| | | दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी | १. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर<br>२. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर व अतिरिक्त मुख्य न्यायादंडाधिकारी |
| | | सह दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| | | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय, बार्शी | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| ३. | तालुका माळशिरस | जिल्हा न्यायाधीश–१ यांचे न्यायालय, माळशिरस | १. जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश<br>२. तदर्थ जिल्हा न्यायाधीश |
| | | दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, माळशिरस | १. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर<br>२. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर व अतिरिक्त मुख्य न्यायादंडाधिकारी |
| | | सह दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, माळशिरस | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | तालुका माढा | दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, माढा | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| ५. | तालुका सांगोला | दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, सांगोला | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| ६. | तालुका मंगळवेढा | दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, मंगळवेढा | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| ७. | तालुका अक्कलकोट | दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, अक्कलकोट | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| ८. | तालुका करमाळा | दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, करमाळा | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |
| ९. | तालुका मोहोळ | दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, मोहोळ | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग |

सोलापूर जिल्हयातील वर नमूद सर्व न्यायालये ही दिवाणी प्रक्रिया संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता व इतर कायदे तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरवून दिलेल्या दिवाणी नियमावली व फौजदारी नियमावली नुसार त्यांच्या न्यायालयास प्राप्त असलेल्या त्या त्या महसूली कार्यक्षेत्रानुसार तसेच त्यांना प्राप्त वित्तीय अधिकारानुसार न्यायदानाचे कामकाज करतात.

➤ दिवाणी विभागाकडील न्यायालयास प्राप्त वित्तीय अधिकार

| अ.क्र. | संवर्ग | वित्तीय अधिकार |
|---|---|---|
| १. | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर | रुपये ५,००,०००/— (रुपये पाच लाख) पर्यंत |
| २. | दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर | रुपये ५,००,०००/— (रुपये पाच लाख) च्या पुढील मूल्यांकनाचे सर्व दावे |
| ३. | जिल्हा न्यायाधीश | दिवाणी वरिष्ठ स्तर यांचे न्यायनिर्णयाविरुध्दची रुपये एक कोटी पर्यंतची सर्व अपिले, तसेच दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, यांचे न्यायनिर्णयांविरुध्दची सर्व अपिले. |

➤ फौजदारी विभाग —

फौजदारी प्रक्रिया संहिता यातील तरतुदीनुसार सत्र न्यायालयात सत्र खटल्यांची सुनावणी घेतली जाते. तसेच मुख्य न्यायदंडाधिकारी व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयामध्ये इतर फौजदारी प्रकरणांमधील सुनावणी घेतली जाते.

➤ जिल्हा न्यायालय, सोलापूर मुख्य इमारत

सोलापूर जिल्हा न्यायालयाचे मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला वळलयानंतर १० मीटर अंतरावर जिल्हा व सत्र न्यायालयाची दगडी बांधकाम असणारी तीन मजली मुख्य इमारत स्थित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर या सध्याच्या दगडी न्यायालयीन इमारतीचे कामकाज सन—१९५० मध्ये सुरु झाले आणि सदर इमारतीचा ताबा इसवी सन १९६० साली मिळाला. सदर इमारतीचे उद्घाटन दि.२५.०६.१९६० रोजी सन्माननीय श्री.एच. के. चैनानी, तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांचे शुभहस्ते करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने इसवी सन १९६० पासून या सध्याच्या दगडी न्यायालयीन इमारतीमध्ये न्यायालयीन कामाकाजाची सुरुवात झालेली आहे.

# नागरिकांकरीता उपलब्ध सोयी–सुविधा

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर

जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर आवारामध्ये पूर्व–उत्तर दिशेला जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर या कार्यालयाची दुमजली इमारत असून २०१६ पासून त्या ठिकाणी वैकल्पिक वाद निवारणासाठीचे कामकाज चालते.

| | |
|---|---|
| आस्थापनेचे नांव | – जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर |
| पत्ता | – जिल्हा न्यायालय आवार, जिल्हा न्यायालय, सोलापूर |
| दूरध्वनी क्रमांक | – ०२१७ २६२०२९२ |
| ईमेल आयडी | – mah-soldlsa@bhc.gov.in |

➤ उद्देश – 'न्याय सर्वांसाठी' हे विधी सेवा प्राधिकरणाचे घोषवाक्य आहे. राज्य घटनेच्या अनुच्छेद १४ नुसार सर्व नागरिकांना समान संधी दिलेली आहे. त्याचप्रमाणे अनुच्छेद ३९ नुसार समाजातील दुर्बल घटकांना मोफत कायदे विषयक सहाय्य देण्याची राज्य शासनाची जबाबदारी आहे. तमाम नागरिकांच्या विशेषत: दुर्बल व गोरगरिबांच्या हक्कांचे व हिताचे रक्षण व जोपासना करण्यासाठी विधी सेवा प्राधिकरणाची स्थापना झालेली आहे.

➤ विधी सेवा प्राधिकरणाचे कार्य –

१. न्यायालय/न्यायाधिकरण/प्राधिकरण समक्ष कोणतेही प्रकरण किंवा इतर कायदेशीर कार्यवाही चालविण्याच्या प्रक्रियेत समुपदेशनाच्या स्वरूपात मोफत विधी सहाय्य पुरविणे आणि मोफत विधी सेवा पुरविणे.

२. खर्च व वेळेची बचत करून तसेच तांत्रिक बाबींचा अडसर टाळून जलदगतीने न्याय मिळवून देण्याच्या हमी करीता, प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच असे वाद जे न्यायालयासमक्ष आणले गेले नाहीत अशा वादांमध्ये सुध्दा समझोता करीता लोक न्यायालय आयोजित करणे.

३. वैवाहिक वाद मध्यस्थ आणि समेट पध्दतीने मिटविणे.

४. कज्जे वादातील पक्षकार आणि सर्व सामान्य जनतेत, सामाजिक व विधी दृष्टया महत्वाच्या मुद्दयांवर कायदेशीर बाबी संबंधी जागरूकता निर्माण करणे.

५. कैद्यांना आणि न्यायाधिन बंदींना मोफत विधी सेवा प्रदान करणे.

➤ आस्थापने अंतर्गत येणारी कार्यालये :–
सर्व तालुका विधी सेवा समिती, जिल्हा सोलापूर

## ➢ कार्यालयीन कामकाजाची माहिती –

समाजातील दुर्बल घटकांना, मागासवर्गीय, स्त्रिया, मुले व इतरांना पुरविण्यात येणा—या विधी सेवा व सल्ला पुरविणे, लोकन्यायालयाचे आयोजन करणे.

## ➢ विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यालयाची रचना –

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यालय हे प्रत्येक जिल्हा स्तरावर कार्यरत असून त्या जिल्हा न्यायालयाचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश हे त्याचे अध्यक्ष आणि वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश हे सचिव असतात. तालुका पातळीवर तालुका विधी सेवा समितीची स्थापना करण्यात आली असून तेथे कार्यरत असणारे वरिष्ठ न्यायाधीश हे त्या समितीचे अध्यक्ष असतात.

## ➢ विधी सेवेस पात्र व्यक्ती –

१. अनुसुचित जाती व जमातीचे व्यक्ती
२. अवैध मानवी व्यापारातील बळी किंवा भिकारी
३. स्त्रिया अथवा बालके
४. दिव्यांग व्यक्ती म्हणजेच अशा व्यक्ती जया अंधत्व, कुष्ठरोग एका ठिकाणाहून दुस—या ठिकाणी जाण्यात असमर्थता, बहिरेपण, मानसिक असमर्थता यांनी ग्रस्त आहेत.
५. सार्वत्रिक आपत्ती, जातीय हिंसाचार, जातीय अत्याचार, पूर दुष्काळी, भूकंप किंवा औद्योगिक आपत्तीचे बळी.
६. औद्योगिक कामगार
७. अन्विक्षाधीन, न्यायालयीन कोठडीत असलेल्या व्यक्ती ज्यांमध्ये सुरक्षागृहातील किशोरवयीन अपराधी, म्हणजेच १८ वर्षे पर्यंत वय असलेल्या व्यक्तींचा किंवा मनोरूग्णालयातील अथवा शुश्रूषालयातील मानसिक रूग्ण यांचा समावेश.
८. वार्षिक उत्पन्न रु ३,००,०००/— पेक्षा कमी असलेल्या व्यक्ती.

➢ विधी सहाय्य प्राप्त करण्यासाठी कशाप्रकारे अर्ज करावा ?

१. संक्षिप्त स्वरूपात तक्रार किंवा सहाय्यता प्राप्त करण्याचे कारण नमूद करून एक लिखीत स्वरूपात अर्ज दाखल करावा.

२. जर अर्जदार अशिक्षित असेल किंवा लिहिण्याच्या स्थितीत नसेल तर, विधी सेवा प्राधिकरण/समिती चे सदस्य सचिव किंवा अधिकारी त्यांचे तोंडी निवेदन नोंदवून घेतील आणि नोंदविलेल्या निवेदनावर त्याची सही/अंगठयाचा ठसा घेतील आणि असे निवेदन अशा व्यक्तीचा अर्ज समजण्यात येईल.

३. अर्जदारास विधी सेवा प्राधिकरण/समितीकडे विनाशुल्क उपलब्ध असलेल्या एका विहित नमुन्यात शपथपत्र निष्पादित करून द्यावे लागेल, ज्यायोगे अर्जदाराची विधी सहाय्य प्राप्त करण्यासंबंधी निकष तपासून घेता येईल.

४. विधी सेवा प्राधिकरण/समितीचे सदस्य सचिव अर्जदाराची त्याने शपथपत्रामध्ये सांगितलेल्या तथ्यांची पडताळणी करण्यासाठी तपासणीसुध्दा करू शकतात.

➢ कोणत्या स्वरुपाची विधी सहाय्यता पुरविली जाते ?

१. कोणत्याही न्यायालयीन कार्यवाहीशी संबंधित देय किंवा झालेला सर्व खर्च,

२. कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीमध्ये मसुदालेखन करणे, दस्तऐवज तयार करणे आणि कायदेशीर कार्यवाहीमध्ये विधी व्यवसायीने प्रतिनिधीत्व करणे यासाठीचा खर्च.

३. कायदेशीर कार्यवाहीमध्ये आदेशांच्या, न्यायनिर्णयांच्या प्रती/प्रमाणित प्रती मिळविण्यासाठी लागणारा खर्च व इतर किरकोळ खर्च

४. कायदेशीर कार्यवाहीमध्ये झालेला इतर खर्च, उदा खटल्याचे कागद—पुस्तक तयार करणे ( ज्यामध्ये कागद, छपाई आणि कागदपत्रांचे भाषांतर सामील आहे ) आणि त्यास अनुषंगिक इतर खर्च.

➢ विधी सेवा प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणारे उपक्रम :

१. विधी साक्षरता शिबिरे भरविणे, चर्चासत्र व कार्यशाळा आयोजित करणे.
२. लोकन्यायालय भरविणे.
३. नुकसान भरपाई योजनांची अंमलबजावणी

१. विधी साक्षरता शिबिरे भरविणे, चर्चासत्र व कार्यशाळा आयोजित करणे.

जनतेस त्यांचे हक्कासंबंधीची जाणीव करून देण्यासाठी व त्यांना कायदेविषयक साक्षर करण्यासाठी शिबिरे, चर्चासत्र व कार्यशाळा आयोजन केले जाते. प्रामुख्याने ग्रामीण व दुर्गम, झोपडपट्टी, कामगार वसाहत, शैक्षणिक संस्था वगैरे ठिकाणी भरविण्यात येतात. अन्याय निवारणाबाबत दाद मागण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

२. लोकन्यायालय भरविणे. लोक न्यायालय म्हणजे काय ?

लोकन्यायालयाचे आयोजन विधी सेवा प्राधिकरणांमार्फत केले जाते. 'लोकन्यायालय' म्हणजे या गाव पंचायतीचे आधुनिक रूप. जेथे कायदा जाणणा—या नि:पक्षपाती लोकांचे न्यायमंडळ त्यांच्यापुढे येणा—या प्रकरणांमध्ये सामंजस्याने न्याय्य तडजोड घडवितात. प्रत्येक जिल्हयाच्या व तालुक्याच्या ठिकाणी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे आदेशानुसार लोकन्यायालयाचे आयोजन केले जाते.

लोकन्यायालयाबाबत माहिती कोठे मिळेल ?

जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये होणा—या लोकन्यायालयांची माहिती त्या त्या जिल्हा व तालुका न्यायालयामध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व तालुका विधी सेवा समित्यांच्या कार्यालयांकडून मिळेल.

३. <u>नुकसान भरपाई योजनांची अंमलबजावणी</u>

<u>पिडीतेस नुकसान भरपाई विषयीच्या योजना</u> :

कलम ३५७ फौजदारी प्रक्रिया संहिता नुसार न्यायालयामध्ये खटला चालू असताना आरोपीस शिक्षा देताना फिर्यादी किंवा पिडीतेस नुकसान भरपाई देण्याची तरतूद फौजदारी प्रक्रिया संहितेत पूर्वीपासून आहे परंतु आरोपी निर्दोष मुक्त झाला, फरार झाला, मयत झाला तर अशा परिस्थितीमध्ये पिडीतेचे नुकसान होवूनसुध्दा नुकसान भरपाई मिळणेकामी तरतूद कायद्यामध्ये नव्हती. त्यानंतर सन २००९ साली कलम ३५७ अ नुसार फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये पिडीतास नुकसान भरपाई योजना याची तरतुद केलेली आहे. त्यानुसार राज्य सरकारने केद्र सरकारशी सल्लामसलत करून पिडीत किंवा वारसांना नुकसान भरपाई मिळावी व त्यांचे पुर्नवसन व्हावे याकरिता योजना तयार करण्याची तरतूद करण्यात आली. सदर दुरूस्तीनंतर पिडीत व वारसांना नुकसान भरपाई मिळण्याच्या दृष्टीने तीन योजना कार्यरत आहेत त्या खालीलप्रमाणे

१. मनोधैर्य योजना.
२. पिडीतेस नुकसान भरपाई योजना.
३. नालसा लैंगिक अत्याचार / इतर गुन्हयातील बळी पडलेल्या / त्यातुन बचावलेल्या महिलांकरिता नुकसान भरपाई योजना २०१८

<u>मध्यस्थी म्हणजे काय ?</u>

मध्यस्थी म्हणजे हस्तक्षेप प्रक्रियेचा एक भाग, ज्यात एक तटस्थ व्यक्ती म्हणजे मध्यस्थ, जो विवादक पक्षकारांमध्ये असणारा तंटा परस्पर संमतीने सोडविण्याकरिता मदत करतो. मध्यस्थी, ही गोपनीय, ऐच्छिक परस्पर सहभाग असणारी अशी प्रक्रिया तर पक्षकारांनी तंटा समोपचाराने सोडवता यावा याकरिता अनुकुल परिस्थिती निर्माण करतो.

मध्यस्थीकरीता अर्ज कसा करता येईल ?

दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ८९ मध्ये नमुद प्रमाणे जर एखाद्या प्रकरणात समोपचाराने तंटा मिटविण्याचा जराही वाव असल्यास पिठासन अधिकारी ते प्रकरण मध्यस्थीकरीता मध्यस्थी केंद्राकडे संदर्भित करू शकतील. दोन्हीही पक्षकार समझोता करण्यास कबूल नसतील, परंतू त्यांची मध्यस्थीच्या माध्यमाने समेटाची शक्यता शोधण्याची प्रामाणिक इच्छा असल्यास अशावेळी सुध्दा ते प्रकरण मध्यस्थीकडे संदर्भित करणे योग्य आहे. मध्यस्थी प्रक्रियेसाठीची कालमर्यादा ६० दिवस असुन ती पक्षकाराच्या किंवा मध्यस्थांच्या विनंतीवरून पिठासन अधिकारी यांचेकडून ९० दिवसापर्यंत पाठविता येते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर या विभागाने दिलेल्या सुविधा किंवा सेवा यांची सुची –

या कार्यालयात व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे विविध प्रकारच्या बैठकीचे आयोजन करता येते. जागोजागी भित्तीपत्रक लावून सर्वसामान्य लोकांमध्ये जनजागृती निर्माण करून त्याची माहिति देण्याचा प्रयत्न केला जातो. या कार्यालयात बसण्यासाठी जागा व पिण्याच्या पाण्याची सुविधा व प्रसाधनगृहेही ही उपलब्ध केलेली आहे.

# माहितीचा अधिकार विभाग

- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरिकाभिमुख कायदा असल्यामुळे पारदर्शकता, उत्तरदायित्व व लोकसहभाग याचा त्रिवेणी संगम आहे.

अ. प्राधिकाराचे नांव : जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर

१. कार्यक्षेत्र : सोलापूर जिल्हा.

२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीकरिता पदनिर्देशित करण्यात आलेल्या सहा. जनमाहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची माहिती :

| अ. क्र. | विभाग/कार्यालयाचे नांव | सहा. जनमाहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर | ... | प्रबंधक, जिल्हा न्यायालय, सोलापूर. | जिल्हा न्यायाधीश—१, सोलापूर. |

ब. प्राधिकाराचे नांव : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर

१. कार्यक्षेत्र : सोलापूर जिल्हा.

२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीकरिता पदनिर्देशित करण्यात आलेल्या सहा. जनमाहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची माहिती :

| अ. क्र. | विभाग/ कार्यालयाचे नांव | सहा. जनमाहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण | वरिष्ठ लिपीक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर | अधिक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर |
| २ | तालुका विधी सेवा समिती | वरिष्ठ लिपीक, तालुका विधी सेवा समिती | अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर |

➤ <u>नकल विभाग</u>

सोलापूर जिल्हा न्यायालयात जिल्हा न्यायालयातील मध्यवर्ती अभिलेख कार्यालय तसेच जिल्हयातील प्रत्येक आस्थापनेमध्ये नकल विभाग हा स्वतंत्रपणे कार्यरत असून न्यायालयीन प्रकरणातील साक्षांकीत नकला जर पक्षकारांना आवश्यक असतील तर नियमास अनुसरुन रितसर अर्ज सादर करुन व त्याचे योग्य ते शुल्क अदा केल्यास, पक्षकारांना न्यायालयीन प्रकरणातील कागदपत्रांच्या साक्षांकीत नकला उपलब्ध करुन दिल्या जातात.

<u>नकलेकरीता आकारले जाणारे शुल्क</u>

१. साध्या दराने प्रती पान रु.४/—
२. तात्काळ दराने प्रती पान रु.७/—

पक्षकाराने नकलेची रक्कम भरल्यानंतर तात्काळ दराने अर्ज असल्यास त्यांना २४ तासांमध्ये व साध्या दराने अर्ज असल्यास त्यांना ४८ तासामध्ये (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळता) नकल उपलब्ध करुन देण्यात येते.

➤ <u>ई—सेवा केंद्र</u> :—

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशान्वये जिल्हा न्यायालयाचे आवारात तदर्थ जिल्हा न्यायालयाच्या इमारतीलगत ई—सेवा केंद्र दि.२१.०३.२०२१ रोजीपासून चालू करण्यात आलेले आहे. न्यायालयीन प्रकरणातील पुढील नेमली तारीख, प्रकरणाची सद्यस्थिती, प्रकरण कोणत्या न्यायालयासमोर प्रलंबित आहे, प्रकरण प्रलंबित आहे किंवा निकाली झाले आहे अशा प्रकारे न्यायालयातील प्रकरणांची वैविध्यपूर्ण माहिती सदर ई—सेवा केंद्रामार्फत पक्षकारांना / विधीज्ञांना उपलब्ध करुन देण्यात येते.

➤ <u>Kiosk मशीन</u> :— सोलापूर जिल्हा न्यायालयाचे आवारामध्ये ठिक—ठिकाणी Kiosk मशीन ठेवण्यात आलेली आहेत. सदर मशीनमुळे न्यायालयीन प्रकरणातील पुढील नेमली तारीख, प्रकरणाची सद्यस्थिती, प्रकरण कोणत्या न्यायालयासमोर प्रलंबित आहे, प्रकरण प्रलंबित आहे किंवा निकाली झाले आहे, प्रकरणामधील आदेश, अशा प्रकारचे न्यायालयातील प्रकरणांची वैविध्यपूर्ण माहिती पक्षकारांना / विधीज्ञांना उपलब्ध होवून मिळू शकते.

- डिस्प्ले बोर्ड :— सोलापूर जिल्हांतर्गत असणा—या सर्व न्यायालयांच्या न्यायाप्रशालचे प्रवेशद्वाराचे दर्शनी भागावर डिस्प्ले बोर्ड लावण्यात आलेले आहेत. सदर डिस्प्ले बोर्डमुळे पक्षकारांना / विधीज्ञांना त्या त्या दिवशी बोर्डावरील कोणत्या न्यायालयीन प्रकरणाचे कामकाज संपले आहे, सुनावणी सुरु आहे आणि तसेच कोणत्या प्रकरणामध्ये सुनावणीचेकामी संबंधीत पक्षकारांना/विधाज्ञांना पुकारले आहे, याची माहिती मिळू शकते.

- उद्‌वाहन :— जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर या मुख्य इमारतीमध्ये पक्षकार/ विधीज्ञ / न्यायालयीन कर्मचा—यांकरीता उद्‌वाहनाची सोय करण्यात आलेली आहे.

- उपहारगृहे — पक्षकारांसाठी / विधाज्ञांसाठी, सोलापूर जिल्हा न्यायालयाचे आवारामध्ये एकूण तीन ठिकाणी उपहारगृहे कार्यरत आहेत.

- वाहनतळे— पक्षकार, विधीज्ञ, न्यायालयीन कर्मचारी/ मा. न्यायीक अधिकारी यांचे करीता,सोलापूर जिल्हा न्यायालयाच्या आवारामध्ये वाहनतळाची सुविधा उपलब्ध आहे.

- प्रसाधन गृहे :—

अ. सोलापूर जिल्हा न्यायालयीन इमारतीच्या बाहय आवारामध्ये व इमारती अंतर्गत पक्षकार, विधीज्ञ, न्यायालयीन कर्मचारी यांचेकरीता महिला व पुरुषांकरीता स्वतंत्र प्रसाधन गृहे उपलब्ध आहेत.

- पिण्याच्या पाण्याची सोय:—
सोलापूर जिल्हा न्यायालय आवारामध्ये सर्वांकरीता ठिक—ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे.

- झेरॉक्स सेंटर:— सोलापूर जिल्हा न्यायालयाच्या आवारामधील पूर्व बाजूस महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी चतुर्थश्रेणी संघटनेचे भाडेतत्वावर देण्यात आलेले उपहारगृह चालू आहे व त्या उपहारगृहालगत पक्षकार, विधीज्ञ यांचेकरीता झेरॉक्स सेंटर भाडेतत्वावर चालविण्याकरीता देण्यात आलेले आहे.

➢ <u>पिटीशन रायटर व टंकलेखक</u> :— दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, सोलापूर या इमारतीमधील पहिल्या मजल्यावर अधिक्षक कार्यालयानजीक एका व्यक्तीस पिटीशन रायटर म्हणून कामकाज करण्याचा या कार्यालयाकडून परवाना देण्यात आलेला आहे.

सोलापूर जिल्हांतर्गत पंढरपूर, बार्शी, माढा, मंगळवेढा या तालुका न्यायालयांचे आवारामध्ये पक्षकार / विधीज्ञांकरीता टंकलेखक म्हणून काही व्यक्तींना परवाना देण्यात आलेला आहे.

➢ <u>स्टॅम्प व्हेंडर</u> :— दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, सोलापूर या इमारतीमधील पहिल्या मजल्यावर अधिक्षक कार्यालयानजीक एका व्यक्तीस स्टॅम्प व्हेंडर म्हणून कामकाज करण्याचा या कार्यालयाकडून परवाना देण्यात आलेला आहे.

➢ <u>टपालपेटी</u> :— पक्षकार, विधीज्ञ व इतर सर्वांकरीता पोस्टाच्या पेटीची सुविधा जिल्हा न्यायालयाच्या मुख्य इमारतीच्या तळमजल्यानजीक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

➢ <u>तक्रारपेटी</u> — सोलापूर जिल्हा न्यायालय व त्या अंतर्गत कार्यरत असणा—या सर्व प्रमुख आस्थापनांचे कार्यालयाचे दर्शनी भागामध्ये तक्रारपेटी ठेवण्यात आलेली आहे.

➢ <u>प्रथमोपचार साहित्यपेटी</u> :— सोलापूर जिल्हा न्यायालय येथे नाझीर कार्यालय तसेच जिल्हांतर्गत असणा—या सर्व आस्थापनामध्ये प्रथमोपचार साहित्यपेटी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

➢ <u>अग्निशामक यंत्र</u> — सोलापूर जिल्हा न्यायालयाचे अंतर्गत येणा—या सर्व इमारतींमध्ये अग्निशामक यंत्रांची उपलब्धता करुन देण्यात आलेली आहे.

(एस.ए.ए. आर. औटी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
सोलापूर

जिल्हा न्यायालय, सोलापूर
दिनांक : २२.०७.२०२२

| | | | |
|---|---|---|---|
| अधिक्षक | अधिक्षक | अधिक्षक | प्रबंधक |
| जि.वि.से.प्रा. | न्यायतांत्रिक | गृहरचना | जि.न्या., सोलापूर |